# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    डी.सी.आर.    दिनांक ०३/०४/२०१८**

## १) फसवणुक :-

**नायगाव :-** दिनांक २२/०८/२०१७ चे १३.३५ वा. पावेतो शिवशंकर कृषी सेवा केंद्र नायगांव जि. नांदेड यातील आरोपीतांनी संगणमत करुन ओरीजनल NPK खताऐवजी बनावट NPK खत ४८ पॉकीट किमती ६,२४०/-रुपयाची विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगुन मिळुन आले. जिवनावश्यक वस्तु कायदयाचे उल्लंघन केले. अशा प्रकारे शेतकऱ्यांची व शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी श्री मुरलीधर तुळशिराम राजे वय ४२ वर्षे व्यवसाय कृषी अधिकारी तथा रासायनिक खत निरीक्षक गटविकास अधिकारी पंचायत समिती नायगांव ह.मु. रा. बडुर ता. निलंगा जि. लातुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. नायगाव** गुरनं ३२/२०१८ कलम ४२०, ३४ भादवी. सह खत नियंत्रण आदेश १९८५ कलम १९(अ)(सी) व जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ ३, ७ अन्वये गुन्हा दाखल असून **तपास पोनि/ वसंत चव्हाण मो.क्रं. ९८२३०५३३९९** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर 02462-244474

# :: आदेश ::

आगामी काळात दिनांक १४.०४.२०१८ रोजी बौध्द बांधवाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२७ वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ३०.०४.२०१८ रोजी बौध्द पोर्णीमा आहे. त्या आर्थी वरील सर्व कार्यक्रम, मिरवणुका शांततेत पार पाडावेत. व त्यात कसल्याही प्रकारची बाधा येवु नये व जिल्हयात शांतता टिकुण राहावी म्हणुन मी चंद्रकिशोर मीणा पोलीस अधीक्षक , नांदेड मला महाराष्ट्र पोलीस कायदा अधिनियम १९५१ प्रमाणे प्रदान झालेल्या अधिकारान्वये खालील आदेश देत आहे.

दिनांक १२.०४.२०१८ चे ००:०० वाजे पासून ते दिनांक ३०.०४.२०१८ चे २४.०० वाजेपर्यंत नांदेड जिल्हयात सर्व पो. स्टे. स्वाधीन अधिकारी असलेले अमलदार किंवा वरीष्ठ अधिकाऱ्यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ मधील पोट कलम "अ" ते "ई" प्रमाणे खालील लेखी किंवा तोंडी आदेश आपापले हद्दीत देण्याचा अधीकार प्रदान करण्यात आला आहे.

अ) रस्त्यावरील व रस्त्यावरुन जाणाऱ्या मिरवणुकितील किंवा जमावातील लोकांनी कोणत्या रितीने चालावे कोणत्या रितीन वागावे ते फर्माविण्यासाठी .
ब) अशा कोणत्याही मिरवणुकाना कोणत्या मार्गाने आणि कोणत्यावेळी जावे किंवा जाऊ नये हे ठरविण्याबद्दल .
क) सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी व पुजेअर्चेच्या प्रार्थनास्थळांच्या सर्व जागेच्या आसपास पुजेअर्चेच्या वेळी कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा येथे गर्दी होणार असेल किंवा अडथळे होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होण्याचा संबध असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होऊ न देण्याबाबत.
ड) सर्व रस्त्यावर किंवा रस्त्यामध्ये सर्व धक्यावर व धक्यामध्ये आणि सार्वजनिक स्नानाच्या कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागेमध्ये व इतर कर्कश वाद्य वाजविणेस वगैरेचे नियमन करण्या बद्दल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत.
फ) महाराष्ट्र पोलीस अधीनियम कलम ३३, ३५, ते ४०, ४२, ४३, ४५, या अन्वये नमुद केलेल्या कोणत्याही हुकमापेक्षा कमी दर्जाचे व त्या पुष्टी देणारे दुय्यम अधिकाऱ्यांना जबाबदारीवर हुकूम करण्याचा मार्गदर्शन पर आदेश देण्याबाबत.
ई) तसे सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणुकीचे ठिकाणी ध्वनीक्षेपण आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुचना देण्यासंबधी.

मी या पुढे असा ही आदेश देतो की, कोणीही सदरचा आदेश लागू असेपर्यंत नांदेड जिल्हयात जाहिर सभा, मोर्चे, निदर्शने, पदयात्रा इत्यादी कार्यक्रम संबधीत पोलीस फौजदार किंवा त्यांच्या वरिष्ठांकडुन तारीख व वेळ, सभेची जागा मिरवणुकीचा व मोर्चाचा मार्ग व त्यात दिल्या जाणाऱ्या घोषणा पुर्व परवाणी शिवाय आयोजित करु नयेत तसेच संबधीत पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेले आदेशाचे पालन करावे. सदर जाहीर सभा मिरवणुक पदयात्रा, समायोचीत घोषणा सोडुन किंवा ज्या घोषणानी शांतता व सुव्यवस्थेला बाधा येवु शकतो अशा घोषणा देऊ नयेत.

सदरचा आदेश लग्नाच्या वरातीस, प्रेत यात्रेस लागु नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास तो माहाराष्ट्र पोलीस कलम १३४ प्रमाणे अपराधास पात्र ठरेल. सदरचा आदेश दिनांक १२.०४२०१८ चे ००:०१ वाजे पासून ते दिनांक ३०.०४.२०१८ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत लागु राहिल.

हा आदेश माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक ०२.०४.२०१८ रोजी दिला आहे.

**(चंद्र किशोर मीणा),**
**पोलीस अधीक्षक, नांदेड.**

**ठिकाण :- नांदेड**
**दिनांक :** ०२.०४.२०१८

**प्रति,**

मॅनेजर, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांना महाराष्ट्र राज्य पत्रिकेत योग्य त्या प्रसिध्दीसाठी .

**प्रत सस्नेहअग्रेषित:**

मा. जिल्हा दंडाधिकारी नांदेड.

**प्रत माहीतीसाठी व उच्चीत कार्यवाहीसाठी :**

सर्व पोलीस अधिकारी (फौजदार व वरिष्ठ अधिकारी ) नांदेड जिल्हा.
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी नांदेड यांना योग्य त्या स्थानिक वृत्तपत्रात विनामुल्य प्रसिध्दीसाठी .